महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, उस्मानाबाद

GOVERNMENT MEDICAL COLLEGE & HOSPITAL, OSMANABAD

कोविड-19 इमारत, जिल्हा रुग्णालय आवार, उस्मानाबाद. (महाराष्ट्र) 413 501

**e-mail:** deangmcosmanabad@gmail.com

जा.क्र. शावैमवरुउ/आस्था-२/ निवासी वै.अ.जाहिरात / 5395 /२०२३ दि. १६ /०९/२०२३

## जाहिरात

**शासन आदेश क्र. पदनि-०७२२/प्र.क्र. १३४/२०२२/वैसेवा-१ मंत्रालय, मुंबई दि. ०१.०८.२०२३ च्या शासन निर्णयानुसार** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, उस्मानाबाद येथील निवासी वैद्यकीय अधिकारी गट -ब यांची मंजुर केलेली आहेत त्यापैकी प्रथम व द्वितीय वर्ष यांची खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे निवासी वैद्यकीय अधिकारी यांची रिक्त पदे स्थानिक विभागीय निवड समिती मार्फत निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात १२० दिवसाकरिता भरण्यासाठी बंधपत्रीत अर्हताप्राप्त पात्र उमेदवाराकडून विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

- अर्जाचा विहीत नमुना कार्यालयीन वेळेत मिळेल.
- अर्ज करते वेळी उमेदवार शासकीय/अशासकीय सेवेत कार्यरत असल्यास त्यांनी अर्ज विहित मार्गाने व विहीत नमुन्यात सादर करावा अन्यथा त्यांच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. (यापुर्वी सादर केलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.)

| अ.क्र. | पद | रिक्त पदांची संख्या | आरक्षण पद संख्या | |
|---|---|---|---|---|
| ०१ | निवासी वैद्यकीय अधिकारी | ०४ | अ.जा | ०१ |
| | | | अ.ज. | ०१ |
| | | | वि.जा.(अ) | ०० |
| | | | भ.ज.(ब) | ०१ |
| | | | भ.ज.(क) | ०० |
| | | | भ.ज.(ड) | ०० |
| | | | वि.मा.प्रवर्ग | ०० |
| | | | इ.मा.व. | ०१ |
| | | | आ.दु.घटक | ०० |
| | | | अराखीव | ०० |
| | | | **एकुण** | ०४ |

(**अ.जा.**-अनुसुचित जाती, **अ.ज.**-अनुसुचित जमाती, **वि.जा.**-विमुक्त जाती, **भ.ज.**-भटक्या जमाती, **इ.मा.व.**-इतर मागास वर्ग, **आ.दु.घ.**-आर्थिक दुर्बल घटक, **वि.मा.प्र**-विशेष मागास प्रवर्ग)

**<u>शैक्षणिक अहर्ता निवासी वैद्यकीय अधिकारी</u> :-** भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकानुसार मान्यताप्राप्त एमबीबीएस पदवी व महाराष्ट्र मेडीकल कॉन्सिलची कायम नोंदणी आवश्यक.

**वेतन :- निवासी वैद्यकीय अधिकारी-एकत्रित मासिक ठोक मानधन-७५,०००/-**

**(शासन निर्णय क्र.एमईडी-२९१९/प्र.क्र.२६२/वैसेवा-३,दि.३१.१२. २०२० नुसार.)**

**वयोमर्यादा:-** मुलाखतीच्या दिवशी निवासी वैद्यकीय अधिकारी पदाकरीता खुला प्रवर्गातील उमेदवारांचे वय ३८ वर्षे व मागास प्रवर्गातील उमेदवाराचे वय ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे.

**अर्ज विक्रीची /स्विकारण्याची तारीख व ठिकाण**

| | | |
|---|---|---|
| ०१ | अर्ज विक्रीचा व स्विकारण्याचा दिनांक | दर बुधवारी कॉलेज कौन्सीलमध्ये मुलाखत होईल. मुलाखतीच्या अगोदर २ दिवस फॉर्म भरुन कार्यालयास सादर करावा. |
| ०२ | प्रत्यक्ष मुलाखत | रिक्त जागेप्रमाणे दर बुधवारी दुपारी ३.०० वाजता राहतील. |

**अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे / प्रमाणपत्रे:-** अर्जासोबत खालील प्रमाणे साक्षंकित प्रती जोडणे आवश्यक आहे. अन्यथा अर्जाचा विचार केला जाणार नाही. नंतर कोणतेही कागदपत्रे स्विकारली जाणार नाहीत.

१. प्रथम द्वितीय,तृतीय वर्ष एमबीबीएस गुणपत्रिका व प्रयत्न प्रमाणपत्र. २. एमबीबीएस एमएमसी नोंदणी प्रमाणपत्र व रिनिवल आवश्यकतेप्रमाणे असल्यास जोडावे. ३.बंधपत्र प्रमाणपत्र. ४.. अनुभव प्रमाणपत्र ५. मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारासाठी जातीचे प्रमाणपत्र व जात वैद्यता प्रमाणपत्र/नॉनक्रिमीलीयर प्रमाणपत्र (दि.३१.०३.२०२४ पर्यतचे वैध) ६. जन्म तारखेकरीता एसएससी प्रमाणपत्र. ७. एचएससी प्रमाणपत्र. ८. एमएस-सीआयटी उत्तीर्ण प्रमाणपत्र ९. बंधपत्रीत उमेदवार म्हणून इतर संस्थेमध्ये काम न केले बाबतचे शपथ पत्र.१०. आंतरवासीयता प्रमाणपत्र.

निवासी वैद्यकीय अधिकारी पदाकरीता उमेदवारांची नियुक्ती १२० दिवसाकरिता तात्पुरत्या स्वरुपात अस्थाई स्वरुपाची राहील व सदर पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत नामनिर्देशनाने भरेपर्यंत किंवा आस्थापना मंडळाकडून वा बदलीने उमेदवार उपलब्ध होईपर्यत किंवा मा.संचालनालय वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई यांचे मार्फत बंधपत्र उमेदवारांची शिफारस होईपर्यंत यापैकी जे आधी घडले तो पर्यत करण्यात येईल.

**गुणवत्ता यादी ही बंधपत्रीत उमेदवाराच्या खालील निकषानुसार बनविण्यात येईल.**

| | |
|---|---|
| १. | महाराष्ट्रातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथुन उत्तीर्ण झालेले एम.बी.बी.एस.तृतीय वर्षाचे मार्क |
| २. | महाराष्ट्रातील इतर खाजगी वैद्यकीय महाविद्यालयातून उत्तीर्ण झालेल्या एम.बी.बी.एस.तृतीय वर्षाचे मार्क |
| ३. | इतर राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयातून उत्तीर्ण झालेले एमबीबीएस विद्यार्थी. |
| ४. | उमेदवाराचे गुण एक सारखे असतील तर उत्तीर्ण होतानाचे प्रयत्न (Attempt) गृहित धरण्यात येईल. ज्या उमेदवाराचे कमी प्रयत्न असतील त्या उमेदवारांना प्रथम प्राधान्य धरण्यात येईल. |
| ५. | या उपरही उमेदवाराचे गुण एक सारखे असतील तर तेथे वयाची जेष्ठता पाहण्यात येईल. |
| ६. | या नंतर महाराष्ट्रातील अबंधपत्रीत उमेदवारांचा अनुक्रमांक १ ते ५ क्रमांकानुसार गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. |

- **वरील सर्व पदे हे निवासी वैद्यकीय अधिकारी यांची असल्यामुळे त्यांना CMO (Casulty Medical Officer) किंवा इतर प्रशासकीय कामे करावी लागतील.**

१. यापुर्वी इतर वैद्यकीय महाविद्यालयात वैद्यकीय अधिकारी वर्ग-२ या पदावर काम करीत असताना आपले काम असमाधानकारक असल्यामुळे जर आपली नियुक्ती रद्द केली असल्यास अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

२. उमेदवारांची निवड ही एमबीबीएस तृतीय वर्षाच्या गुणांकानानुसार केले जाईल. जरी उमेदवार हा पदवी किंवा पदव्युत्तर पदवी असला तरीही सदर निवड तृतीय वर्षाच्या गुणांकानानुसार केले जाईल.

३. **जर निवड झालेला उमेदवार पदव्युत्तर पदवी किंवा पदविका असला तरी त्यांना कुठल्याही विभागात काम करावे लागेल. त्यांना स्पेशालिटी म्हणून त्या विभागात नियुक्ती मिळणार नाही.**

४. उमेदवारांच्या मुलाखती नंतर उर्वरित उमेदवारांची प्रतिक्षा यादी तयार करण्यात येईल व जसे जसे पदे रिक्त होतील त्या प्रमाणे नियुक्ती देणेबाबत सहा महिन्यापर्यंत विचार करण्यात येईल. तसेच ही प्रतिक्षा यादी महाविद्यालयातील समकक्ष पदे भरण्यासाठी वापरण्यात येईल.

५. या पदासाठी व्यवसायरोध भत्ता असल्यामुळे उमेदवारांना खाजगी व्यवसाय करता येणार नाही, तसे १०० रु. च्या बॉन्ड पेपरवर खाजगी व्यवसाय करत नसल्याचे शपथपत्र सादर करावे. जर खाजगी व्यवसाय करत असल्याचे निदर्शनास आले किंवा तक्रार आली तर निवड झालेल्या उमेदवारांची नियुक्ती कोणतीही पुर्वसुचना न देता नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.

६. EWS च्या आरक्षणाकरीता उमेदवारांनी योग्य ती प्रमाणपत्रे जोडावीत व आरक्षणाच्या नियमानुसार विचार करण्यात येईल.

७. वरील जाहिरातीमधील पदांच्या संख्येत कमी /अधिक करण्याचा तसेच निवड समिती मार्फत निवड झालेल्या उमेदवाराचे नियुक्ती आदेश निर्गमित करण्याचा अथवा प्रलंबीत ठेवण्याचा अथवा नियुक्ती रदद करण्याचा अथवा सदर जाहिरात रद्द करण्याचा अधिकार राखुन ठेवण्यात येत आहे.

८. विहित नमुना अर्जाची किंमत रु ५००/- आहे. रोखपाल यांचेकडे रोख रक्कम रु ५००/- चा भरणा केल्यानंतर अर्जाचा पुरवठा करण्यात येईल.

९. वरील जाहिरातीची वैधता रिक्त जागा भरेपर्यंत किंवा पुढील ६ महिनेपर्यंत अनुज्ञेय राहील.

**(डॉ. शिल्पा व. दोमकुंडवार)**
**अधिष्ठाता**
**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, उस्मानाबाद**

**प्रत :-** १) मा.आयुक्त (वैद्यकीय शिक्षण), वैद्यकीय शिक्षण व संशोधन,मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) डॉ.मंगेश सं. सेलुकर, प्राध्यापक व विभागप्रमुख शरीररचनाशास्त्र तथा अध्यक्ष वि.नि.मं. शा.वै.म.व.रु. उस्मानाबाद.
३) सर्व प्राध्यापक व विभाग प्रमुख शा.वै.म.व रु. उस्मानाबाद.
४) वैद्यकीय अधिक्षक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, उस्मानाबाद.
५) सुचना फलक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, उस्मानाबाद.
६) रोखपाल, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, उस्मानाबाद यांना देऊन आदेशित करण्यात येते की, उमेदवारांकडुन आवेदन पत्राकरीता रोख रक्कम रु.५००/-भरणा करुन घ्यावे व तशी पोच पावती त्यांना देण्यात यावी.
७) डॉ. शारदा सोनखेडकर, वरीष्ठ निवासी यांना प्रत देऊन सुचित करण्यात येते की, त्यांनी निवासी वैद्यकीय अधिकारी पदाकरीता प्राप्त होणाऱ्या आवेदन पत्रांची प्राथमिक तपासणी करावी व श्री. एस.एस.कुलकर्णी, वरीष्ठ सहाय्यक, आस्था-२ यांनी गणवत्ता यादी तयार करावी.
८) सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय.
९) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, उस्मानाबाद वेबसाईट इंचार्ज डॉ.सदानंद सं. भिसे, प्राध्यापक व विभागप्रमुख न्यायवैद्यकशास्त्र.